# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/09/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :- अंतर्गत 02 कि. मी अंतरावरील मौजा साई अपार्टमेन्ट सुकळी रोड ता. हिंगणा एमआयडीसी जवळ बोरी येथे दिनांक 05/09/2021 चे 19.00 वा ते दिनांक 06/09/2021 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- दिनेश नथ्थुजी मंडल, वय 56 वर्ष, मौजा साई अपार्टमेंट सुकळी रोड ता.हिंगणा एमआयडीसी जवळ बोरी यांनी आपली एमएच- 40/बीयु- 4894 क्रमांकाची हिरो होन्डा स्प्लेन्डर प्लस मोअरसायकल हि बिल्डींग चे खाली लॉक करुन ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. 30,000/-रु. चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ईकबाल शेख 9923740240 हे करीत आहे

### दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :- अंतर्गत बाबुलखेडा ग्रामपंचायत जवळ येथे दिनांक 06/09/2021 चे 10.30 वा. ते 11.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे- मिथुन वंसतरावजी झोड, वय 28 वर्ष, रा. वार्ड क्र 02, बाबुलखेडा त. कामठी जि. नागपुर व आरोपी नामे- हर्षल सुनिल पाटील, वय 23 वर्ष, रा. बाबुलखेडा हे एकाच गावात राहत असुनयातील आरोपी याने फिर्यादीचा भाउ नामे- अमोल वंसतरावजी झोड, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र 02, बाबुलखेडा त. कामठी जि. नागपुर याला जुन्या वादाच्या कारणावरून वादविवाद करून शिवीगाळ करून कोणत्यातरी धारदार शस्त्राने पायावर मारून जखमी केले व पुन्हा मारण्याची धमकी दिली

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान मो न 8208511663 हे करीत आहे.

### . अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. कुही :- अंतर्गत खापरी राजा ता. अमरेड जि. नागपूर येथे दिनांक 05/09/2021 चे 07:00 वा. दरम्यान मनोहर कुलवतजी राउत (मृतक), वय 55 वर्ष, रा. खापरी राजा हे वे पोइन्ट ट्रेडिंग कंपनी येथुन घरी चहा पानी पिण्याकरीता गेले होते. यानंतर ते घरून 07.30 वा. सुमारास पुन्हा वे पोइन्ट ट्रेडिंग कंपनी खापरी फाटा येथे जात असतांना अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक याला जोरदार धडक दिली व गंभीर जखमी करून पळून गेला. या अपघातात मनोहर राउत यांचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार विजय कुमरे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री बाबुराव राऊत मो.न. 7020753909 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत 3 कि. मी. अंतरावरील जयदुर्गा मंगल कार्यालय, कन्हान येथे दिनांक 05/09/2021 चे 13:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— देविदास लखनसिंग गुजर, वय 26 वर्ष, रा. जिआरसी एरीया कन्हान हा त्याची आई नामे— भगवानदेवी लखनसिंग गुजर, वय 60 वर्ष व पत्नी नामे— मयादेवी कुमारी गुजर व पुतन्या नामे— कान्हा असे मिळुन दुपारी थ्री व्हिलर आटो क्र एमएच— 49/एआर— 1620 नी कान्द्री येथुन सामान खरेदी करून त्याच ऑटोने परत जात होते. त्यादरम्यान आरोपी ऑटो चालक नामे— सुधीर याने त्याचे ताब्यातील ऑटो भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडकटींग डिवायडर ला जोरदार धडक दिली. या अपघातात फिर्यादी हा रोडचा बाजुला पडल्याने फिर्यादीचा उजवा पाय फॅक्चर झाला. फिर्यादीच्या आईच्या डोक्यावर व मानेवर मार लागुन त्या गंभीर जखमी होवून त्यांचा जागीच मृत्यु झाला. तसेच आटो चालक आरोपी हा सुद्धा गंभीर जखमी झाला आहे. फिर्यादी व त्याची पत्नी मिलीटरी हॉस्पीटल कामठी येथे उपचार घेत आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री जावेद शेख मो.क्र 9403692766 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर